पनवेल, जिल्हा रायगड येथील जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांना कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : डीडीओ ०७१९/६०६/प्र.क्र.१३८/का.११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि. १३ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक:- संकीर्ण ०८१६/४८३/प्र.क्र.११४/का-११, दि.१७ ऑक्टोंबर,२०१८
२) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक:- संकीर्ण ०८१६/४८३/प्र.क्र.११४ (भाग-२)/ का-११, दि.०४ जानेवारी,२०१९
३) शासन अधिसूचना विधि व न्याय विभाग क्रमांक:- संकीर्ण ०८१६/४८३/प्र.क्र.११४/ का-११, दि.१८ जुलै, २०१९
४) जिल्हा न्यायालय, रायगड यांचे पत्र जावक क्रमांक: प्रशा/४४१६/२०१९, दि.२३ जुलै, २०१९ व जा.क्र.प्रशा /४५१०/सन २०१९,दि.२९.०७.२०१९

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.१ येथील दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रायगड जिहयातील पनवेल येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र.२ येथील दिनांक ०४ जानेवारी,२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर न्यायालयाकरीता आवश्यक खर्चासाठी लागणा-या निधीबाबत मान्यता देण्यात आली आहे. अ.क्र.३ येथील दिनांक १८ जुलै, २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक २७ जुलै, २०१९ पासून जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, पनवेल, जि.रायगड हे न्यायालय कार्यान्वित झाले आहे. सबब,संदर्भाधीन अ.क्र.४ च्या पत्रान्वये जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,पनवेल,जि.रायगड यांना कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पनवेल, जि.रायगड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय पनवेल या न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल, जि.रायगड यांना “कार्यालय प्रमुख” तसेच “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर आदेश वित्तीय बाबींपुरतेच मर्यादित राहतील.

२. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८,दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील भाग पहिला, उप विभाग, १ मधील अनुक्रमांक ३, नियम क्रमांक २ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम १५(३) व १५६ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१३१५०११८५५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.08.13 15:07:09 +05'30'

(सं. सं. नवगिरे)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) प्रबंधक (निरीक्षणे- १/२), उच्च न्यायालय, मुंबई.
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जि.रायगड.
३) जिल्हा न्यायाधीश- १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,पनवेल,जि.रायगड.
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा)महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, जि.रायगड-अलिबाग.
६) उप कोषागार अधिकारी,पनवेल,जि.रायगड-अलिबाग.
७) कक्ष अधिकारी का.७/२३/२४/२५/,विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती.